व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र प्रकल्प
व्यवस्थापन समितीस मान्यता देणेबाबत

**महाराष्ट्र शासन**
**रोजगार व स्वयंरोजगार विभाग**
**शासन निर्णय क्रमांकः रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१**
५वा मजला, जी.टी.रुग्णालय संकुल
नवीन मंत्रालय, मुंबई-४०० ००१
तारीख: ०७ नोव्हेंबर,२०१४

वाचा §

1) **शासन निर्णय क्रमांकः रोजगार व स्वयंरोजगार विभाग, रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१ दि.१९ मे,२०१४**
2) **आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास , रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय यांचे पत्र क्र.रोस्वसं-९/सीजीसीसी अंमलबजावणी/१०३५८/२०१४ दि.१४ ऑक्टोबर,२०१४**

**शासन निर्णय§**

शासन निर्णय, रोजगार व स्वयंरोजगार विभाग, क्र.रोस्वरो-२०१२/प्र.क्र.३०९/रोस्वरो-१ दि.१९ मे,२०१४ अन्वये प्रथम टप्प्यात राज्यातील मुंबई-उपनगर, औरंगाबाद, नागपूर, सांगली व सिंधुदुर्ग या पाच जिल्हा रोजगार व स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्रांमध्ये व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र सुरु करण्यास प्रशासकीय मान्यता देण्यात आली. सदर योजनेच्या अंमलबजावणीचा वेळोवेळी आढावा घेण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन समिती स्थापन करण्याच्या सूचना आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास यांना देण्यात आल्या होत्या. त्यानुसार त्यांनी समिती गठीत करुन त्यास मान्यता देण्याचा प्रस्ताव त्यांच्या दि.१४ ऑक्टोबर ,२०१४ च्या पत्रान्वये शासनास सादर केला. तरी, सदर प्रस्तावास अनुलक्षून महाराष्ट्र राज्यात व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र स्थापन करणे या योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेण्यासाठी गठीत केलेल्या खालील प्रकल्प व्यवस्थापन समितीस शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

| व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्र प्रकल्प व्यवस्थापन समिती | | |
|---|---|---|
| **अ.क्र.** | **पदनाम** | **समितीतील पद** |
| १ | प्रधान सचिव, रोजगार व स्वयंरोजगार विभाग | अध्यक्ष |
| २ | आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास | उपाध्यक्ष |
| ३ | सह सचिव/ उप सचिव (रोस्वरो-१), रोजगार व स्वयंरोजगार विभाग | सदस्य |
| ४ | संबंधित उपसंचालक ( विभागीय मुख्यालय), रोजगार व स्वयंरोजगार | सदस्य |
| ५ | निवड होणा-या संस्थेचे प्रतिनिधी | सदस्य |
| ६ | CII ( भारतीय प्रतिस्पर्धा आयोग), FICCI( फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री), ASSOCHAM (असोसिएन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री), INDIAN MERCHANT CHAMBERS यांचे प्रतिनिधी | निमंत्रित सदस्य |
| ७ | उपसंचालक (रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय) | सदस्य सचिव |

सदर समितीची कार्यकक्षा ही रोजगार व स्वयंरोजगार विभागाच्या दि.१९ मे,२०१४ च्या शासन निर्णयात नमूद केल्यानुसार खालीलप्रमाणे राहील.

१. व्यवसाय मार्गदर्शन व समुपदेशन केंद्रांच्या फलनिष्पत्तीबाबतचा आढावा वेळोवेळी घेणे व अपेक्षित उद्देश साध्य होत नसल्यास त्यावर उपाययोजना सुचविणे.

२. सदर योजना राबवितांना येणा-या अडचणीचे निराकरण करुन योजना यशस्वी होईल असे मार्गदर्शन करणे.

३. उद्योजकांशी विचार विनिमय करुन काळानुरुप कोणत्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे याचा वेळोवेळी आढावा घेणे.

४. काळानुरुप नवीन अभ्यासक्रमाचा प्रशिक्षणाच्या योजनेत समावेश करण्याबाबत शिफारस करणे.

५. कंकरट इव्हॅल्युएशन अहवाल तथा समितीने योजनेचा वेळोवेळी घेतलेला आढावा विचारात घेऊन योजनेच्या स्वरुपात आवश्यक ते फेरबदल करण्यास सूचना व मार्गदर्शन करणे.

६. योजनेचा विस्तार करणेबाबत धोरण ठरविणे.

७. समितीने सुचविलेल्या सुधारणांसह फलश्रुतीचा अहवाल वेळोवेळी संचालनालयास सादर करणे.

८. योजनेसाठीच्या पुढील दरवर्षीच्या आवश्यक अनावर्ती व आवर्ती निधीचा प्रस्ताव संचालनालयास सादर करणे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१४१११०१५२२४३९३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Sandesh Chhabu Tadvi

Digitally signed by Sandesh Chhabu Tadvi
DN: c=IN, o=Government of maharashtra, ou=ESE, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Sandesh Chhabu Tadvi
Date: 2014.11.11 14:28:30 +05'30'

**सं.छ.तडवी**
**अवर सचिव**

प्रत,

१. मा.प्रधान सचिव , रोजगार व स्वयंरोजगार विभाग यांचे स्वीय सहायक
२. आयुक्त, रोजगार, स्वयंरोजगार व कौशल्य विकास, रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकणभवन, नवी मुंबई
३. सह सचिव/ उप सचिव (रोस्वरो-१), रोजगार व स्वयंरोजगार विभाग, मंत्रालय, मुंबई
४. CII(भारतीय प्रतिस्पर्धा आयोग), FICCI (फेडरेशन ऑफ इंडियन चेंबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री)ASSOCHAM( असोसिएन चेबर ऑफ कॉमर्स ॲण्ड इंडस्ट्री), INDIAN MERCHANT CHEMBERS यांचे प्रतिनिधी यांना आयुक्त (रोस्वरो) मार्फत
५. उपसंचालक , रोजगार व स्वयंरोजगार संचालनालय, कोकणभवन, नवी मुंबई
६. संबंधित उपसंचालक ( विभागीय मुख्यालय-सर्व), रोजगार व स्वयंरोजगार
७. निवडनस्ती- रोस्वरो-१